महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ११/१०/२०२४

संदर्भ :- महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३ दि.१० ऑक्टोबर २०२४

विषय :- पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर १) काळवाडी पोलीस ठाणे, २) बावधन पोलीस ठाणे, ३) संत तुकारामनगर पोलीस ठाणे व ४) दापोडी पोलीस ठाणे असे एकुण ४ नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे-२०२४/प्र.क्र.६७/ जपुक(२९), दि.१० ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१०११५३०१५५०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर/ पिंपरी चिंचवड
पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रामीण)
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर १) काळेवाडी पोलीस ठाणे, २) बावधन पोलीस ठाणे, ३) संत तुकारामनगर पोलीस ठाणे व ४) दापोडी पोलीस ठाणे असे एकूण ४ नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४.

संदर्भ :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.DGP-D2GA०१४२/२७/२०२४-DESK २६A, दि.०५.०३.२०२४, दि.२८.०५.२०२४ व दि.२५.०९.२०२४.

२) उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ८.१०.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे दि. ०९.१०.२०२४ रोजीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

शासन निर्णय, गृह विभाग, दि.२८/५/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली आहे. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अधिपत्याखाली एकूण १८ पोलीस स्टेशन कार्यान्वित असून सुमारे ४१२ चौ. किमी पेक्षा जास्त क्षेत्र असून, त्यापैकी बरेच क्षेत्र हे औदयोगिक वसाहतीचे आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालयाची निर्मिती होत असताना उक्त आयुक्तालयासाठी एकूण ४८४० पदे मंजूर करण्यात आली. त्यापैकी २२०७ पदे ही पुणे शहर आयुक्तालय व पुणे ग्रामीण पोलीस यांचेकडील मंजूर पदामधुन वर्ग करण्यात आली व २६३३ पदे ही नव्याने तीन टप्प्यांमध्ये चार वर्षामध्ये निर्माण करण्यात आली.

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालयामधील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने संदर्भाधीन क्र.१ येथे नमूद पत्रांद्वारे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत वाकड पोलीस ठाणे, हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी पोलीस ठाणे व भोसरी पोलीस ठाणे यांचे विभाजन करुन अनुक्रमे **१) काळेवाडी पोलीस ठाणे, २) बावधन पोलीस ठाणे, ३) संत तुकारामनगर पोलीस ठाणे व ४) दापोडी पोलीस ठाणे** असे एकूण ४ पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता.

**शासन निर्णय:-**

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आस्थापनेवरील सध्याच्या कार्यरत वाकड पोलीस ठाणे, हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी पोलीस ठाणे व भोसरी पोलीस ठाणे यांचे विभाजन करुन अनुक्रमे **१) काळेवाडी पोलीस ठाणे, २) बावधन पोलीस ठाणे, ३) संत तुकारामनगर पोलीस ठाणे व ४) दापोडी पोलीस ठाणे असे** एकूण ४ पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच उक्त नमूद ०४ पोलीस ठाण्यांकरिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ ते ड"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकूण ३८६ पदे (नियमित) निर्माण करण्यास व ०४ सफाईकामगार ही पदे (बाह्ययंत्रणेद्वारे) घेण्यास, व त्याकरिता येणाऱ्या रु.२३,६५,९६,७०४/-(रुपये तेवीस कोटी पासष्ट लाख शहाण्णव हजार सातशे चार फक्त) इतक्या आवर्ती खर्चास व रु.३,२७,५६,८००/- (रुपये तीन कोटी सत्तावीस लाख छप्पन्न हजार आठशे फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. या ०४ पोलीस ठाण्यांकरीता "सफाई कामगार" (प्रति पोलीस ठाणे ०१ याप्रमाणे) या पदाच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारा घेताना वित्त विभागाच्या दि. २७/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन करण्यात यावे.

४. उक्त पोलीस ठाण्यांकरिता येणारा आवर्ती व अनावर्ती खर्च उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उपरोक्त नमूद ०४ पोलीस ठाणेकरिता हद्दनिश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर करावा.

६. उक्त शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१०१८१९१४१५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.10.10 18:05:44 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस  आयुक्त, पिंपरी चिंचवड.
पोलीस आयुक्त, पुणे.
पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण).
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-अ"**

काळेवाडी पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण
करण्यात येणा-या पदांचा तपशील

**अ) नियमित पदे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | आवर्ती खर्च | अनावर्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९००० ते रू.१५५८००) | ०२ | रु.५,७७,२९,६४८/- | रु.८१,८९,२००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०३ | | |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | ०९ | | |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | ०८ | | |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | २३ | | |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ५० | | |
| **एकूण पदे** | | | ९५ | | |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा:-**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय अकुशल गट-ड कर्मचारी (सफाई कामगार) | ०१ |

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-ब"**

बावधन पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण
करण्यात येणा-या पदांचा तपशील

**अ) नियमित पदे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | आवर्ती खर्च | अनावर्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९००० ते रू.१५५८००) | ०२ | रु.५,५८,२५,०२०/- | रु.८१,८९,२००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०३ | | |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | ०९ | | |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | ०९ | | |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | २३ | | |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ४५ | | |
| **एकूण पदे** | | | ९१ | | |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा:-**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय अकुशल गट-ड कर्मचारी (सफाई कामगार) | ०१ |

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-क"**

संत तुकारामनगर पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण
करण्यात येणा-या पदांचा तपशील

**अ) नियमित पदे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | आवर्ती खर्च | अनावर्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९००० ते रू.१५५८००) | ०२ | रु.६,१९,३२,६२४/- | रु.८१,८९,२००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०४ | | |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | ११ | | |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | ११ | | |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | २४ | | |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ४८ | | |
| **एकूण पदे** | | | १०० | | |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा:-**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय अकुशल गट-ड कर्मचारी (सफाई कामगार) | ०१ |

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-०८२४/प्र.क्र.५४/पोल-३
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-ड"**

दापोडी पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण
करण्यात येणा-या पदांचा तपशील

## अ) नियमित पदे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | आवर्ती खर्च | अनावर्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९००० ते रू.१५५८००) | ०२ | रु.६,११,०९,४१२/- | रु.८१,८९,२००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०३ | | |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | १० | | |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | ११ | | |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | २३ | | |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ५१ | | |
| **एकूण पदे -** | | | १०० | | |

## ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा:-

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय अकुशल गट-ड कर्मचारी (सफाई कामगार) | ०१ |